सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर


शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२२/ 155 दिनांक:- 17 JAN 2022

प्रति,

प्राचार्य /संचालक,

शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- महाविद्यालयात प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्याचे महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाची नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ:- सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण, नागपूर यांचे पत्र जाक्र. सआसकना/शिष्य./महाडिबीटी अर्ज नोंदणी/२०२१-२२/२१८ दि. १२/०१/२०२२.

सोबत जोडलेल्या संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सर्व संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे शिष्यवृत्तीकरिता विद्यार्थ्याचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली असून सदर योजनांतर्गत आपल्या संस्थेतील प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेता यावा. याद्दष्टीकोनातून संर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे संस्थास्तरावरून विहीतमुदतीत कार्यवाही करण्यात यावी. जेणे करून सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणे शक्य होईल.

तसेच आपण न केलेल्या कार्यवाही मुळे पात्र विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती पासून वंचित राहीले तर यांची सर्वस्वी जबाबादारी प्राचार्याची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत:- सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण, नागपूर , यांना माहितीकरिता

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औदयोगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रध्दानंद पेठ, नागपूर -२२

**दुरध्वनी/फॅक्स क्र.** ०७१२-२२२१०४१, २२२१०४३ ई-मेल- acswnagpur@gmail.com


जाक्र.सआसकना/शिष्य./महाडीबीटी अर्ज नोंदणी/2021-22/ 218 दिनांक:- / /2022 12/1/2022

प्रति,

१) मा. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर

२) मा. कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विदयापीठ, नागपूर

३) मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभाग, नागपूर

४) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, नागपूर

५) मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर

**विषय** :- महाविदयालयात प्रवेशीत सर्व मागास प्रवर्गातीलविदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाची नोंदणी महा डीबीटी पोर्टलवर करण्यासाठी आपले स्तरावरून सुचना निर्गमीत करणेबाबत..

**संदर्भ** :- नागपूर जिल्हयातील सर्व महाविदयालयांचे प्राचार्य यांना या कार्यालयाचे पत्र क्र. १४७ दिनांक ०६.०१.२०२२

**महोदय,**

विषयांकीत प्रकरणी सविनय सादर करण्यात येते की, संदर्भीय पत्राव्दारे नागपूर जिल्हयातील सर्व महाविदयालयांचे प्राचार्य / मुख्याध्यापक यांना महाविदयालयामध्ये प्रवेशीत सर्व मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांचे महा डीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाचे १०० टक्के नोंदणीकरण होईल या संबंधाने कार्यवाही करणेबाबत सुचना या कार्यालयाव्दारे निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. महाविदयालयांमध्ये प्रवेशीत सर्व मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांना शासनाच्या विवीध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्याकरीता शैक्षणिक सत्र २०१८-१९ पासुन महा डीबीटी पोर्टल विकसीत करण्यात आले असुन सदर पोर्टलवर विदयार्थ्यांनी नोंदणी करून अर्ज सादर करणे आवश्यक आहे. शैक्षणिक सत्र २०२१-२२ या वर्षाकरीता शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज नोंदणीकरण/ तपासनी/ अर्ज मंजुरीची प्रकीया दिनांक १४.१२.२०२१ पासुन सुरू झालेली आहे. मागील शैक्षणिक सत्र २०२०-२१ मध्ये नागपूर जिल्हयामध्ये अनुसूचीत जाती प्रवर्गातील एकुण ४९१३६ विदयार्थ्यांनी तसेच इतर मागास प्रवर्ग, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील एकुण ८६८६९ विदयार्थ्यांनी महा डीबीटी पोर्टलवर नोंदणी केली होती. आज दिनांक १२.०१.२०२२ च्या सदयस्थिती नुसार शैक्षणिक सत्र २०२१-२२ या वर्षाकरीता नागपूर जिल्हयामध्ये अनुसूचीत जाती प्रवर्गातील एकुण १५२९२ विदयार्थ्यांनी तसेच इतर मागास प्रवर्ग, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील २२२९३ विदयार्थ्यांनी नोंदणी झालेली असुन नोंदणीकरणाचे प्रमाण फक्त २५ टक्के दिसुन येत आहे.

मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाची नोंदणीचे प्रमाण वाढविणेसाठी आपले स्तरावरून अधिनस्त महाविदयालयांना आदेशवजा सुचना निर्गमीत करण्याची कृपा करावी जेणेकरून मागास प्रवर्गातील सर्व विदयार्थ्यांना शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ अदा करणे या कार्यालयास शक्य होईल.

माहीतीस्तव सविनय सादर.

**सहपत्र** :- संदर्भ क्र. १ चे पत्र

सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर. 290 दिनांक 17 JAN 2022

आपला विश्वासु,

(बाबासाहेब देशमुख)

**सहाय्यक आयुक्त,**

**समाज कल्याण, नागपूर.**

प्रतिलिपि :-

**मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर.**

सहाय्यक आयुक्त,

समाज कल्याण, नागपूर

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रासमोर, श्रध्दानंद पेठ, नागपूर-२२
दुरध्वनी / फॅक्स क्र.०७१२-२२२१०४१,२२२१०४३ ई-मेल- acswonagpur@gmail.com

जाक्र.सआसकना/शिष्य./महाडिबिटि/२०२१-२२/ 147 दिनांकः- / /२०२१
06/01/2022

प्रति,

प्राचार्य /मुख्याध्यापक,

________________

________________

जि. नागपूर.

**विषय :- महाविद्यालयात प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांच्या, अर्जाची नोंदणी पोर्टलवर करणेबाबत.**

**संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्रं.सआसकना/शिष्य./महाडिबिटी/अर्ज/२०२१-२२/२७९५ दिनांक २०-०९-२०२१.**

**२) या कार्यालयाचे पत्र क्रं.सआसकना/शिष्य./महाडिबिटी/अर्ज/२०२१-२२/३५९६ दिनांक २९-११-२०२१.**

**३) या कार्यालयाचे पत्र क्रं.सआसकना/शिष्य./महाडिबिटी/अर्ज/२०२१-२२/३८७५ दिनांक १६-१२-२०२१.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२१-२२ या वर्षाकरिता शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज नोंदणीकरण / तपासनी / अर्ज मंजुरीची प्रकिया दिनांक १४-१२-२०२१ पासुन सुरु झालेली आहे.संदर्भ क्रं.१ अन्वये सन २०२१-२२ या सत्रात महाविद्यात प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज नोंदणी करण्याच्या अनुषंगाने सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्रं.२ अन्वये शैक्षणिक सत्र २०२१-२२ करिता महाविद्याचे प्रोफाईल,अभ्यासक्रम ,शुल्क रचना अद्यावत व मंजुर करणेबाबतच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्रं.३ अन्वये शैक्षणिक सत्र २०२१-२२ या वर्षामधील महाडिबिटी पोर्टलवरील सर्व पात्र अर्जाची तपासनी करुन या कार्यालयास पाठविणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

शैक्षणिक सत्र २०२१-२२ या मध्ये नागपुर जिल्हयामध्ये अनुसूचित प्रर्वगातील सर्व शिष्यवृत्ती योजनांचे एकुन ४७२७५अर्ज महाडिबिटी पोर्टलवर होते. आज दिनांक ०६-०१-२०२२ च्या सद्यस्थिती नुसार १०५७५अर्जाची नोंदनी झालेली असुन, नोंदनीचे प्रमाण फक्त २०% दिसुन येत आहे,ही अतिशय गंभीर बाब असुन महाविद्यालयात प्रवेशित सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनचे अर्ज भरण्यासाठी सुचना देण्याबाबत आवाहन आपल्या स्तरावरुन करावे. जेणेकरुन सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेणे शक्य

होईल सहपत्रातील सुचना महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लाऊन त्याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे,महाविद्यालयात प्रवेशीत सर्व मागास प्रर्वगातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाचे १००% नोंदणीकरण होईल या संबंधाने आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलटटपाली या कार्यालयास सादर करावा.
सबब पुढील कार्यवाहीस्तव सादर.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, नागपूर.करीता

**प्रतिलिपि माहीतीस्तव सविनय सादर :-**

१) **मा. आयुक्त समाज कल्याण म.रा.पुणे.**

२) **मा. संचालक इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय म.रा.पुणे.**

३) **मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग,नागपूर.**

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, नागपूर.करीता